# मुंबई विद्यापीठ

दूरध्वनी नं:—०२२—२२८७३६९६
वेबसाईट :— www.nssmu.org
राष्ट्रीय सेवा योजना विभाग,
विद्यापीठ विद्यार्थी भवन,
२ रा मजला, 'बी' रोड,
चर्चगेट, मुंबई — ४०० ०२०.

प्रत्र क्र.रासेयो/७९५ /२०१३—१४
दिनांक :— ०४.१२.२०१३

प्रति,
प्राचार्य,
..............................,
..............................,
..............................,

संदर्भ : क्रमांक रासेया—२०१३/प्र.क्र.१०४/साशि—७ दिनांक: १ नोव्हेंबर, २०१३

विषय : अवयव दान (Organ Donation) व थॅलेसेमिया (Thalassemia) चाचणी उपक्रमाबाबत...

मा. महोदय,

उपरोक्त विषयानुसार राज्य संपर्क अधिकारी व विशेष कार्य अधिकारी यांनी कळविल्याप्रमाणे महाविद्यालयीन राष्ट्रीय सेवा योजना विभागाद्वारे अवयव दान (Organ Donation) व थॅलेसेमिया (Thalassemia) उपक्रम घेण्याबाबत कळविण्यात आलेले आहे. त्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभाग, वैद्यकीय शिक्षण विभाग व महाराष्ट्र वैद्यकीय शास्त्र विद्यापीठ यांची मदत घेता येईल.

थॅलेसेमिया (Thalassemia) चाचणी संदर्भात यापूर्वी चर्चा केल्याप्रमाणे काही महाविद्यालयात उपक्रम सुरू आहे तथापी ज्या महाविद्यालयात असे उपक्रम झाले नाहीत त्यांनी रक्तदान शिबिर आयोजित करताना सदरचा उपक्रम घेण्यात यावा व त्यासाठी या विषयात कार्य करणाऱ्या स्वयंसेवी संस्था व शासकीय विभागाची मदत घेण्यात यावी.

अवयव दान (Organ Donation) या विषयी समाजामध्ये जनजागृती निर्माण करून जे विद्यार्थी स्व:ता अवयव दान करण्यास तयार होतील अशा विद्यार्थ्यांचे राष्ट्रीय सेवा योजना दैनिदिनीमध्ये नोंद करण्यात यावी.

वरील दोन्ही उपक्रमासंदर्भात विद्यार्थ्यामध्ये जाणीव जागृती निर्माण करण्यासाठी कार्यशाळा, प्रदर्शन, बॅनर इत्यादी मार्फत विविध उपक्रम राबविण्यात यावेत व वर्षाभरातील उपक्रमाचा कार्य आढावा, छायाचित्रे, वर्तमान पत्रातील कात्रणे यासहीत या विभागास पाठविण्यात यावा.

धन्यवाद !

आपला विश्वासु,

डॉ. अतुल हं. साळुंके
प्रभारी कार्यक्रम समन्वयक, रा.से.यो. विभाग